# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४२ वा ❑ शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शुभांशू शुक्ला भारताचे गौरव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

भारताचे नाव जगात उंचावणारे गगनयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आपल्या ऐतिहासिक अंतराळ यात्रेनंतर मंगळवारी दुपारी पृथ्वीवर परतले आहेत देशाच्या या यशस्वी सुपुत्राने १४० कोटी लोकांची मन जिंकून घेतलेली आहे. ग्रुप कॅप्टन शुभांश शुक्ला हे २५ जून रोजी फ्लोरिडा येथील केलेली स्पेस सेंटर येथून फाल्कन रॉकेटने अंतराळात गेले होते आता ते सुखरूप परतलेले आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवस वास्तव्य केल्यानंतर शुभांशू आपल्या एक्सीओम -४ मिशन मधील तीन सहकारी अंतराळवीरांसह प्रशांत महासागरात कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ यशस्वीरित्या उतरले.

शुभांशू शुक्ला हे भारताचे गौरव आहेत. ते भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन आहेत आणि ॲक्सिओम-४ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला () भेट देणारे दुसरे भारतीय आहेत आणि आयएसएसवर पाऊल ठेवणारे पहिले भारतीय आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे भारताला केवळ अभिमानच नाही तर देशाच्या अंतराळ क्षमतांचे प्रदर्शनही झाले आहे.

शुभांशू शुक्ला यांनी २५ जून २०२५ रोजी स्पेसएक्सच्या ॲक्सिओम-४ मोहिमेअंतर्गत आयएसएसवर उड्डाण केले. हे अभियान भारताच्या अंतराळ प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि गगनयान मोहिमेच्या तयारीचा एक भाग आहे. आयएसएसवर त्यांनी अंतराळात वनस्पतींची वाढ आणि मानवी आरोग्यावर सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचा परिणाम यासह अनेक वैज्ञानिक प्रयोग केले.

शुभांशू शुक्ला यांचे हे अभियान आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधनात भारताला एक नवीन ओळख देईल.त्यांच्या परतीने राजकीय नेत्यांनी आणि भारतातील सामान्य नागरिकांनी त्यांच्या कामगिरीचा आनंद साजरा केला. शुभांशू शुक्ला यांनी १९८४ मध्ये राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय बनून इतिहास रचला आहे. त्यांचे पुनरागमन हा भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे आणि त्यामुळे देशातील तरुणांनाही प्रेरणा मिळेल.

भारतीय हवाई दलाने ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्लाच्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासाबद्दल अभिमान आणि उत्साह व्यक्त केला आहे. एक्स वर एक भावनिक संदेश शेअर करताना वायुसेनेने लिहिले की, ‘‘आकाशाच्या पलीकडे, आता ताऱ्यांकडे जाणारा प्रवास हा आपल्या हवाई योद्ध्याच्या ताकदीचे आणि समर्पणाचे प्रतीक आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ल एका विशेष अंतराळ मोहिमेवर जाऊन , जिथे ते पुन्हा एकदा पृथ्वीच्या सीमेपलीकडे तिरंगा घेऊन गेले. राकेश शर्माच्या उड्डाणानंतर ४१ वर्षांनी, हा पुन्हा एक अभिमानाचा क्षण आहे, जो भारताची प्रगती आणि अंतराळात वाढणारी पावले प्रतिबिंबित करतो. हे केवळ एक अभियान नाही तर भारताचे नवीन उंचीकडे जाणारे उड्डाण आहे.‘‘ शुभांशू शुक्ल हे भारतीय हवाई दलाचे अनुभवी लढाऊ पायलट आहेत आणि आता अंतराळवीर म्हणून त्यांनी देशाला एक नवीन ओळख दिली आहे. या मोहिमेत त्यांच्यासोबत अमेरिका, पोलंड आणि हंगेरी येथील अंतराळवीरांचाही समावेश देखील होता.

अंतराळवीर शुभांश शुक्ला हे भारताचे पहिले आयएसएस वरील अंतराळवीर असून त्यांचे हे यश इस्त्रोच्या गगनयान मोहिमेच्या तयारीत एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शुभांशू शुक्ला यांचा प्रवास भारताच्या अवकाश स्वप्नांना नवे उंचीवर घेऊन गेला आहे. आकाशातील स्वदेशी प्रयोग, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि भविष्यातील मानव युक्त गगन यासाठी याचा उपयोग होईल. हे केवळ एका व्यक्तीचे यश नाही तर भारताच्या वैज्ञानिक परंपरेचा नवा किती स्तंभ आहे.

गगनयात्री शुभांश शुक्ला यांनी भारताच्या ॲक्सी ओम ४ मिशन अंतर्गत सात मायक्रो ग्रॅव्हिटी प्रयोग केले आहेत यापैकी चार प्रयोग यशस्वी झाले आहेत शुभांशू शुक्ला यांनी सूक्ष्म ग्रुप आकर्षणात मानवी आरोग्य आणि वनस्पतींची वाढ यावर महत्वपूर्ण प्रयोग केले. या काळात शुभांश शुक्ला यांनी भारतात आखण्यात आलेले मुंग व मेथीच्या बियांचे अंकुरण स्टेम सेल संशोधन व मायक्रो अल गीशी संबंधित सूक्ष्म गुरुत्वाबाबतचे सात प्रयोग पूर्ण केले. शून्य गुरुत्वात पाण्याच्या बुडबुड्याच्या प्रयोग करून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाना विषयी उत्सुकता निर्माण केली. कम्प्युटर, मोबाईल, टीव्ही सारख्या स्क्रीन असलेल्या गोष्टींच्या वापरामुळे मेंदूवर होणाऱ्या परिणामांचाही अभ्यास केला.






# साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब

## प्रत्येक माणूस साहित्यिक संजय व्यापारी यांचे प्रतिपादन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – साहित्य हे समाजाचे जिवंत प्रतिबिंब असते जीवनातील अनुभूतींच्या अभिव्यक्ती मुळे प्रत्येक माणूस साहित्यिक असतो असे विचार ज्योतिर्मय साहित्य या ऑनलाइन दैनिक पत्राचे संपादक संजय व्यापारी यांनी व्यक्त केले ते केशव प्रभात नगरात वसंत व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी बोलत होते. प्रारंभी केशव प्रभात नगराचे कार्यवाह श्री बाभुळगावकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर प्राध्यापक विल धारूरकर यांनी त्यांचा परिचय करून दिला आपल्या प्रकट मुलाखतीमध्ये संजय व्यापारी यांनी ऑनलाइन वृत्तपत्रांचे अद्भुत विश्व कसे बदलत आहे याची मार्मिक माहिती दिली, आपल्या विवेचनात छोटी छोटी उदाहरणे देऊन त्यांनी वर्तमान युगात प्रत्येक व्यक्ती सोशल मीडियामुळे संपादक प्रकाशक आणि साहित्यिक बनली आहे आपल्याला जीवनात येणारे अनुभव जर आपण शब्दबद्ध केले तर त्यातून श्रेष्ठ साहित्याची निर्मिती होऊ शकते. एका नवशिक्या लेखिकेने काही कविता लिहून पाठविल्या त्यावर थोडेसे संस्कार केले आणि त्यांना कसे लिहावे याचे मार्गदर्शन केले पुढे त्या प्रतिभाशाली कवयित्री बनल्या आणि त्यांनी अखिल भारतीय साहित्य संमेलनात काव्यवाचन केले. ज्येष्ठ व्यक्तींनी आपल्या जीवनाच्या संध्याकाळी जीवनात आलेल्या भल्या-बुऱ्या अनुभवांचे कथन जर आत्मचरित्र सारख्या माध्यमातून केले तर त्यामुळे भावी पिढीला मार्गदर्शन मिळू शकते उद्योग व्यवसाय व्यापार तसेच खेळ इत्यादी अनेक क्षेत्रात यश शिखरावर पोहोचलेल्या व्यक्तींनी आपले जीवनानुभव जिवंतपणे आणि प्रभावीपणे अभिव्यक्त केले असता त्यातून श्रेष्ठ कलाकृती निर्माण होऊ शकतात असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या या व्याख्यान प्रसंगी विजय जोग यांनी स्वागत गीत सादर केले तर साकळगावकर देशमुख यांनी शेवटी आभार मानले या प्रसंगी डॉक्टर रामदास सपकाळ तसेच बाळासाहेब काटे लंबाळे गुरुजी, दुर्गादास जोशी, निवृत्त अभियंता राऊत तसेच श्रीहरी आंबेकर आणि बजाज ऑटोचे व्यवस्थापक फुलारी हे उपस्थित होते.



## इच्छाशक्ती व बुद्धीच्या जोरावर लक्ष्य गाठणे सहज शक्य, करिअर मार्गदर्शक वक्ता प्रा. डॉ. नरेंद्र भुसारी यांचे प्रतिपादन

ज्योतिर्मय साहित्य

**जालना–** विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना सर्वप्रथम आपली अभिरुची, क्षमता लक्षात घेऊन इच्छाशक्ती व बुद्धीच्या जोरावर करिअरचे लक्ष गाठणे सहज शक्य होत असल्याचे प्रतिपादन करिअर मार्गदर्शक वक्ता प्रा. डॉ. नरेंद्र भुसारी यांनी केले.

राजस्थानी समाजातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व गुणवंतांच्या सत्कार सोहळयात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भारतीय जैन संस्थेचे अध्यक्ष हस्तीमल बंब तर प्रमुख पाहुणे म्हणून नरेंद्र मोदी, विजयराज सुराणा, सुदेश सकलेचा आदींची उपस्थिती होती. डॉ. भुसारी म्हणाले, स्वतःच्या भावभावनांचा ताळमेळ, सामाजिक समायोजन करण्याची क्षमता देखील लक्षात घ्यायला हवी. शिक्षण हे एक मात्र असे साधन आहे की, ज्याद्वारे जीवनात स्वर्ग निर्माण करता येतो. आजच्या प्रचलित काळात सर्व सुविधा आणि समाधान म्हणजेच जीवनातील स्वर्ग आहे, हे केवळ दर्जेदार उच्च शिक्षण प्राप्त करून साध्य करता येते. कोणतेही करिअर चुकीचे नाही. नवीन शैक्षणिक धोरणातही क्रिएटिव्हिटीला प्राधान्य देण्यात आले आहे. मुलांमधील क्षमता अर्थात क्रिएटिव्हिटी समजून घेऊन त्यांना प्रेरणा देत त्यांच्या करिअरचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी पालकांनी व शिक्षकांनी स्वतः मार्गदर्शकाची भूमिका पार पाडायची आहे. मित्राच्या म्हणण्यानुसार करिअर निवडणे हे चुकीचे ठरू शकते! सर्वच शाखा करिअरसाठी महत्त्वपूर्ण असतात. थोडक्यात सांगायचे झाल्यास कला शाखा म्हणजे करिअरचा हिंद महासागर, विज्ञान शाखा पॅसिफिक महासागर, कॉमर्स शाखा म्हणजे अटलांटिक महासागर आहे. त्यात उडी घेऊन करिअरचा किनारा गाठण्याची क्षमता तुमच्यात असायला हवी. नुसती इच्छा असून चालत नाही, क्षमतेला इच्छाशक्तीची जोड देऊन कठोर परिश्रमाची तयारी हवी.

# एलन मस्क यांचे राजकीय भवितव्य अधांतरी...






ज्योतिर्मय साहित्य

एकीकडे टेक्सास राज्यात प्रचंड महापुराने १०० पेक्षा अधिक लोकांचा बळी घेतला आणि डोनाल्ड ट्रम्प महोदय मात्र दुसरीकडे कुठल्या देशावर किती कर लावावेत याची गणिते मांडत बसले आहेत. अमेरिका एकाहून एक भिन्न वेगवेगळ्या वादळांना सामोरे जात असताना तेथील पहिल्या क्रमांकाचे उद्योगपती आणि अमेरिकेचे कुबेर म्हणविले जाणारे एलन मस्क यांनी एक नवे वादळ आणले आहे, त्यांनी टाकलेले राजकीय गणित मोठे अद्भुत आहे त्यांना असे वाटते की रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक हे दोन्ही पक्ष सारखेच आहेत. अमेरिकेला आता तिसऱ्या नव्या पर्यायी पक्षाची गरज आहे. खरे तर अमेरिका स्वतंत्र झाली त्यानंतर कुठलाही तिसरा पक्ष आतापर्यंत मूळ धरू शकला नाही तसे अमेरिकेच्या राजकीय जीवनात या दोन पक्षापेक्षा अनेक छोटे-मोठे पक्ष आहेत पण त्यांची गणना तिसरा पक्ष एवढीच केली जाते अशा पक्षांमध्ये आता नव्याने भर पडली आहे, आतापर्यंत अमेरिकेत अस्तित्वात असलेल्या तिसऱ्या पक्षामध्ये प्रामुख्याने द ग्रीन पार्टी तसेच लिबर्टी रियल पार्टी, कॉन्स्टिट्यूशनल पार्टी आणि नॅशनल लॉ पार्टी यांचा समावेश आहे या पक्षामध्ये आता एलन मस्क यांच्या अमेरिकन पार्टीची भर पडली आहे हा पक्ष कानामागून आला आणि नाकापेक्षा मोती जड झाला असे होईल का त्याचे भवितव्य काय आहे खरोखरच हा पक्ष अमेरिकन राजकारणात हुकमाचे पान बनू शकेल काय? पैसे कमविण्यात माहहीर असलेले मस्क राजकारणाचा जुगार कसा खेळतील कवड्या कशा प्रकारे टाकतील आणि राजकारणाच्या बुद्धिबळ पटावर त्यांना चेकमेट खरोखरच देता येईल काय, आपले प्यादे पुढे कसे सरकवावयाचे दुसऱ्या पक्षांना कोंडीत कसे आणावयाचे याबाबतीत मस्क आता कोणती पावले टाकतात याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

नवे गणित नवे समीकरण एलन मस्त यांनी चार जुलै रोजी नवे गणित मांडले. त्यांनी आपल्या एक्स वर असे पोस्ट केले की डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडलेले तथाकथित सुंदर आर्थिक विधेयक मंजूर झाले तर अमेरिकेचा धोका लक्षात घेऊन ते नवा पक्ष स्थापन करतील त्यांच्या या सोशल मीडिया पोस्टला ६५ टक्के चाहत्यांनी होकार दिला मान डोलावली त्यांनी माना डोलावताच मस्क यांनाही चांगलाच चेव आला आणि त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी नवा राजकीय पक्ष ‘‘अमेरिकन पार्टी‘‘ या नावाने आकारास येईल अशी घोषणा केली. नव्या पक्षाचे बारसे झाले, घुगऱ्याही घातल्या कानात कुरकुर करून त्याचे नावही ठेवले, आता हा नवा पक्ष अमेरिकेच्या कोणत्या घटक राज्यात किती प्रभुत्व मिळवितो आणि मतदारांना कसा व किती प्रमाणात आकर्षित आकर्षित करू शकतो यावरच या पक्षाचे भवितव्य अवलंबून असणार आहे रिपब्लिकन पक्ष हा उजव्या विचाराचा आणि डेमोक्रॅट पक्ष हा डाव्या विचाराचा असे आजचे चित्र आहे पण मस्क यांच्या या नव्या पक्षामुळे त्यांची राजकीय लाईन जर उजव्या विचाराची असेल तर त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव हा रिपब्लिकन वोट बँकेवर होणार आहे हे निश्चित परंतु जर मस्क यांनी काही नवा प्रयोग केला नवा मध्यम मार्ग निवडला तर मात्र ते डेमोक्रॅटिक पक्षावर सुद्धा मायाजाल टाकू शकतात व्हाईट हाऊस वर कुबेराची सावली एलन मस्क यांनी मागील लोकसभा निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा दिला त्यांच्या विजयानंतर मस्क यांनीही आनंदोत्सव साजरा केला एवढेच नव्हे तर ते स्वतःला प्रति राष्ट्रपती समजून त्या तोऱ्यात वागू लागले प्रशासकीय यंत्रणेला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना एक विशेष भाग देण्यात आला त्या आधारे त्यांनी अमेरिकेतील प्रशासकीय यंत्रणेचे झोप उडवून दिली हे सारे नव्याचे नऊ दिवस होते पुढील चार-पाच महिन्यानंतरच ट्रम्प व मस्क यांच्यात खटके उडू लागले दोघेही शेरास सव्वाशेर एकमेकांना ऊणे-दुने बोलू लागले, जाहीर भांडणे झाली, दोन बिग बुलमधील भांडणाचा परिणाम अमेरिकेच्या अर्थकारणावर राजकारणावर काय होतो याची गणिते राजकीय पंडित मांडत होते, परंतु एलन मस्क ट्रम्प यांच्या झोम्बणाऱ्या टीके मुळे वावरले घाबरले, त्यांची झोप उडाली आणि ही डोकेदुखी एवढी वाढत चालली की शेवटी मस्क यांना वेगळी चूल मांडावी लागली त्यामुळे झालेली भांडणे उडालेले खटके हे तात्पुरते नव्हते ती एक वादळापूर्वीची शांतता होती. काही लोकांना वाटले होते की आता पॅचअप झाले आहे दोघांच्या मध्ये मेतकूट जमले आहे पण एका आठवड्यातच पुन्हा स्फोट झाला आणि डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर नवा राजकीय पक्ष स्थापन करण्याची घोषणा होताच अनेकांना धक्का बसला त्याचे कारण म्हणजे मस्क यांचा वाढलेला आत्मविश्वास आणि आपण अर्थकारणच काय अमेरिकेचे राजकारण सुद्धा हलवू शकतो असे त्यांना वाटू लागल्यास नवल ते काय. डोनाल्ड ट्रम्प महोदय नव्या पक्षाच्या स्थापनेची खिल्ली उडविताना त्यांच्या या प्रयत्नाचे वर्णन हास्यास्पद असे करतात, वरवर पाहता हे खरे असले तरीही मस् यांच्या या उपद्रपामुळे ट्रम्प यांच्या पोटात गोळा आला आहे हे कोणाही सुजण्यास कळू शकते, खरे तर नजीकच्या भविष्यकाळात मस्क यांना स्वतंत्रपणे राजकीय वाटचाल करताना काही धोक्यांना सामोरे जावे लागणार आहे त्यांच्या खाजगी उद्योगांना मिळणारे सरकारचे समर्थन यापुढे सैलपणे मिळणार नाही, जी काही मदत नियमानुसार असेल तेवढीच त्यांना मिळू शकेल त्यामुळे त्यांना सत्ताधारी पक्षाशी भांडण घेणे पंगा पत्करणे ही बाब परवडणारी नाही त्यामुळे याला मस्त हा आक्रमक राजकीय पवित्रा किती काळ कायम ठेवतात आणि पुढे चालून ते कोणत्या पक्षाशी नर्मायचे धोरण स्वीकारतात याकडे निरीक्षकांचे लक्ष लागलेले आहे कारण राजकारणात कोणीही कधीही कायमचे मित्र व शत्रू नसतात ही गणिते सतत बदलत असतात ही गोष्ट खरी आहे त्यामुळे भविष्यकाळात कोणती गणिते मस्क मांडतात आणि त्यांच्या या समीकरणातून काय बाहेर पडते हे आज सांगता येणार नाही परंतु त्यांच्या राजकारणाचा लसावी आणि मसावी काढाव्याचा झाल्यास असे म्हणता येईल की तूर्त त्यांना धक्का तंत्र वापरावयाचे होते व ते त्यांनी वापरले आहे आणि त्यांच्या राजकारणाचे महत्तम सामर्थ्य कशामध्ये असेल तर तिसरा पक्ष तयार करून काही उमेदवार निवडून आणावयाचे आणि दोन्ही पक्षावर आपला वचक ठेवावयाचा हे त्यांचे तंत्र आहे परंतु अमेरिकेतील सुज्ञ जागरूक राजकीय मतदार त्यांच्या या भूलथापाला किती बळी पडतात हा खरा प्रश्न आहे भविष्यकाळात एलन मस्क यांना राजकीय वाटचाल करताना केवळ शब्दांच्या बुडबुड्यांनी काम करता येणार नाही राजकीय पक्षाची भक्कम बांधणी करताना ध्येयवादी कार्यकर्त्यांची गरज असते तसेच पक्ष म्हणून अमेरिकन पार्टी जर प्रत्येक घटक राज्यात प्रत्येक मोठ्या शहरात बांधावयाची असेल तर त्यांना घोषणा केली ही गोष्ट खरी आहे परंतु पुढे चालून हा विश्वामित्र पवित्रा किती काळ टिकेल हे सांगता येत नाही

एलन मस्क यांच्या उद्योग समूहांची विविधता अद्भुत आहे एक्स असो ते स्लोकार असो किंवा त्यांची ए आय कंपनी असो या प्रत्येक क्षेत्रात ते यश शिखरावर आहेत आता त्यांचा नवा राजकीय पक्ष म्हणजे अमेरिकन पार्टी कुठल्या पातळीवर कशी कशी कुठे असेल हे याचे भाकीत आज करता येणार नाही यांना राजकीय वाटचाल करण्यासाठी अजून बराच दूरचा प्रवास करावयाचा आहे, लांबचा पल्ला गाठावयाचा आहे, त्यांनी घाई गर्दीने महत्त्वाकांक्षेपोटी मोठी स्वप्ने बाळगू नयेत कारण उद्योग आणि राजकारण यात मोठा फरक असतो. उद्योगात काही गोष्टी मेहनतीने परिश्रमाने ताबडतोब साध्य करता येतात पण राजकारण हे बुडबुड्यासारखे असते वादळासारखे असते या वादळात शिरणे सोपे पण वादळातून सुखरूप बाहेर पडणे त्याहून अवघड. तेव्हा याला मस्क यांनी आता राजकारणाच्या वादळात उडी घेतली आहे या वादळातून ते कसे बाहेर पडतील हे आता पहावयाचे आहे त्यांना उत्तरेत दक्षिणेत कोठे प्रतिसाद मिळेल ते रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅटिक या पक्षांपैकी कोणाच्या वोट बँक वर डल्ला मारतील, आपले समर्थन कसे तयार करतील हे आज सांगता येणार नाही भविष्यकाळात मस्क यांची वाटचाल ही अंधारातून प्रकाशाकडे जाणारी ठरो एवढीच आमची प्रार्थना आहे नाहीतर त्यांच्या नशिबी हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्याची पाळी येऊ शकते त्यामुळे त्यांनी सावध वाटचाल करणे अधिक चांगले आणि तेवढेच त्यांच्या हिताचे ठरेल.




# जात्यावरच्या ओव्या......

वारं वावधानं
उच्या झाडाची दईन
मी भाऊची बहिण
उभी राहुन दाविनं ||१७२||

मावळला दिस
तुळशीला दिवा लावा,
अशी पुण्याई
इघ्न जातीन बारा शीवा ||१७३||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# माणूस भेटतो तेव्हा...




ज्योतिर्मय साहित्य

ही तुमची प्रगती ? बहिणाबाई शाळेत न जाता एवढं सांगू शकल्या. आणि तुम्ही एवढं शिकून.. सुरुवातीला स्वतःला शहाणा समजणारा मी आता वरमलो होतो. माझा स्वर खाली आला होता. मी थक्क झालो. माझ्या 'माणूस' असण्यावरच प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. तेव्हा तो शांतपणे म्हणाला,''माणूस असण्याची लक्षणं फक्त बाह्य नसतात. माणूस म्हणजे कृतज्ञता तुम्हाला हा निसर्ग, ही धरती, धान्य पिकवणारे, उन्हातानात कष्ट करणारे शेतकरी भरभरून देत असतात. देशाचे रक्षण करणारे सैनिक सीमेवर प्राणपणने लढत असतात. तुम्ही करता कधी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त ? शिकवता कधी तुमच्या मुलांना अशी कृतज्ञता व्यक्त करायला ? पैसे फ`कले की एखादी वस्तू विकत मिळते एवढेच त्यांना माहिती आहे. एखाद्या शेतकऱ्याच्या शेतीचे पावसाने अपार नुकसान झालेले असते. कधी मुलांना घेऊन अशी शेतं दाखवायला गेलात ?



संयम

संयमानं व्यक्त व्हायला शिकता आणि शिकवता का कधी आपल्या मुलांना ? एखादी वस्तू नाही मिळाली किंवा ती उशिराने मिळणार असेल तरी संयम राखला पाहिजे. कोणत्याही गोष्टीचा आनंद सुद्धा संयमाने घ्यायला शिकलं पाहिजे हे संस्कार आपल्या मुलांवर कधी करणार ?

दुसऱ्यासाठी थांबणं

जेवण्यापूर्वी, चांगल्या गोष्टी करण्यापूर्वी कधी थांबावसं वाटलं इतरांसाठी ? सगळ्यांना मिळाल्यावर मी घेईन ही भावना होते का मनात निर्माण ?


दुसऱ्यासाठी मदतीचा हात पुढे करणं

तुम्ही भाग्यवान आहात. तुम्हाला नशिबाने सगळं मिळालं आहे परंतु असे काही दुर्दैवी जीव आहेत की ज्यांच्या नशिबात बऱ्याच गोष्टी नसतात. मला जे मिळालं आहे त्यात त्यांचाही वाटा आहे असं वाटतं का कधी ? त्यांना देण्यासाठी आपला हात पुढे करावा असं वाटतं का ?

मनमोकळं हसणं

हसणं हे माणूस असण्याचं एक विशेष लक्षण आहे. मनमोकळं हसलात कधी ? तुमचं हसणं सुद्धा कृत्रिम आणि मोजून मापून !

**(क्रमशः)**





## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# गुरूनिश्चय

ज्योतिर्मय साहित्य


बाईला स्वातंत्र्य जरूर मिळाले पाहिजे पण तिने निसर्गाने दिलेले अत्युच्च पद ''माता'' पदाचा सन्मान कायम ठेवला पाहिजे. पाश्चातांचे अंधानुकरण करून स्वतःचे, संस्कृतीला तिलांजली मिळणार नाही. सासर,माहेरचा सन्मान कसा वाढेल हे सतत ध्यानात ठेऊन वागले पाहिजे.

तुझे विमानातील पाऊल असु दे, शास्त्रज्ञ असणे, पंतप्रधानपदी असलेली तू अभिमान आहेचं गं पण संसाराची जबाबदारी पार पाडताना तुला तारेवरची कसरत करावी लागते हे तर खरं आहे पण!

हवं ते खाण, पिणं, कपडे, कुठेही जाईन येईन. मला कुणी विचारायचा अधिकार नाही. ह्या अहंकारी किंवा अडेलतट्टू स्वभावाने हातात आलेले वैभव कमी होत आहे. या कडे सर्व स्त्री वर्गाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अंगभर कपडे घालणे म्हणजे गबाळेपणा हा स्वतः विणलेला कोष आहे. गच्च बांधलेले केस अंगभर कपडे डोईवर पदर अशी मनात कुटूंब, समाज याबद्दल अतिशय कणव असलेली तुझी प्रतिमा बेछूट वागण्याने बदनाम होऊ देऊ नकोस. राजमाता जिजाऊ, अनेक क्रांतिकारी महिला. सावित्रीबाई फुले आनंदीबाई जोशी या अशा अनेकांच्या संघर्षातुन तू ईथपर्यन्त आली आहेस याचा विसर पडू देऊ नकोस. मी नाही म्हणत की तू नववार साडी नेस काळाबरोबर तू अवश्य बदल.पण पाळण्याची दोरी तुझ्याच हातात आहे हे निसर्गाने तुला दिलेले अमुल्य वरदान आहे. हे कधीच विसरू नकोस,. कुठल्याही गोष्टीचं अती झाले की त्याचीमाती होतेच, त्यासाठी तु स्वतःला सावर. तुझ्या पंखात खुप बळ आहे।तुला अजुनही खुप ऊंच भरारी घ्यायची आहे ती तु नक्कीच घेत आहे !पण ? स्वातंत्र्य आणि स्वैराचार या दोन शब्दांत अगदी बारीक रेषा आहे ती तुलाच पुसायची आहे. आयुष्य जगताना एक लक्ष्मणरेषेचं भय कायम ध्यानात ठेव .चांगल पेरत रहा चांगलेच ऊगवत रहाणार !कारण तू स्त्रीशक्ति आहेस आदिमायेचं रूप आहे आणि ही तर आपली भारतीय संस्कृती आहे तिला जोपासत स्वतःचं स्थान निर्माण कर ऊंचं ऊंच भरारी घेत रहा पण तुझ्या पिलांकडे दुर्लक्ष होऊ देऊ नकोस. स्वतः ला सांभाळ!कारण तु मायाळू ,दयाळू अशी कोमलमाता आहेस.

टिप, हा विचार सर्वांच्या साठी नाही, सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

**(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# संत हे चालते-बोलते देवच आहेत

ज्योतिर्मय साहित्य

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा, आणि सद्गुरूआज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनावर जोर द्यावा. स्वत: कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यापरते दुसरे भाग्य ते कोणते ? हृदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो हृदयात नाही असे कसे म्हणावे ?

तुम्ही मला उपनिषदांतले सांगा म्हटले तर कसे सांगू ? ज्याने जे केले तेच तो सांगणार. एक - गुरुआज्ञापालन याशिवाय दुसरे काहीच मी केले नाही, तर मी दुसरे काय सांगणार ? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो! संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्राच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे.

श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कीव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दु:ख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत की, त्यांमध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो, की संतांची हाक ऐकूच येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवूया, म्हणजे भगवत्प्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल.

संत-संगती आणि नामस्मरण यानेच भगवत्प्रेम येईल.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

भगवंताशी कोणते तरी एक नाते बांधावे लागते तो तुमचा स्वामी आहे तो तुमचा पती आहे तो तुमचा मित्र आहे इतकेच काय तर तो तुमचा शत्रू आहे ,अशा कुठल्यातरी नात्यात त्याच्याशी सतत दृढ भावनिक संवाद साधावयाचा असतो. भावनेवर चालणाऱ्या स्त्रिया ह्या अधिक यशस्वीपणे असे नाते भगवंताशी जोडू शकतात. तिथे माऊली ही स्वतःस स्त्री समजून भगवंताची सख्या भावाने भावनिक नाते जोडतात. त्यांच्या या स्त्रीभावाचे प्रतीक म्हणूनच मीच मी एकली असे स्त्री रूपातील उद्गार आलेले आहेत.

बाप रखुमादेवीवरु हृदयीचा जाणुनी अनुभव सौरसु केला/
दृष्टीचा डोळा पाहू मी गेलीये /तव भितरू पालटू झाला//

परमात्म्याला आलिंगन द्यायचे म्हणून माझ्या मनाची जी कांही आस होती, हा माझ्या हृदयीचा भाव जाणून मला अनुभवाचा प्रसाद भगवंताने दिला. माझ्या नेत्रांनी मी भगवंतांना पाहत होते तर आता तोच परमात्मा माझ्या अंतरंगात व्याप्त होऊन उरला आहे हा अनुभव मला आला असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

ज्ञानेश्वर महाराज हे एक महान योगी होते त्यांच्या समृद्ध सिद्ध साधनेतून त्यांचे आलेले हे दिव्य अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत ज्या अवस्थेत हे अनुभव येतात त्या अवस्थेत शब्द जवळ नसतात तरीपण माऊलींचे हे सामर्थ्य की त्यांनी इतक्याचं चपखल शब्दात हे अनुभव आपणापर्यंत पोहोचविले.

इथे समाधी अवस्थेत माऊलींना, मंदिरात पांडुरंगाचे दर्शन घेताना आलेला अनुभव त्यांनी विदीत केला आहे. आपणास असे वाटेल की समाधी अवस्थे साठी एका जागी डोळे मिटून बसणे आवश्यक आहे. मग मंदिरात मूर्तीचे दर्शन घेताना त्यांना ही समाधी अवस्था कशी आली?

हे योग्यच आहे की समाधीच्या सुरुवातीच्या काळात सिद्धासनात बसून डोळे मिटल्यानंतरच समाधीचा अनुभव येऊ शकतो, पण सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ झाला त्यानंतर निर्वीकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. तोही दृढ झाला की एकाच वेळेस माणूस व्यवहारात वावर करताना दिसतो. तो लोकांशी बोलतो, वागतो पण तो समाधी अवस्थेतूनच हे सर्व कार्य करीत असतो. अशा सिद्ध योग्यालाच ब्रह्मचारी म्हणतात. म्हणूनच १६,१०८ बायकांचा पती असणारा, यातील प्रत्येक पत्नीस दहा दहा मुले होऊनही श्रीकृष्ण कायम ब्रह्मचारी होते. माऊलींचा ही ब्रह्मचारी अवस्थेतील हा अनुभव आहे. त्यामुळे व्यवहारात असूनही माऊली सतत समाधीस्थ असत.

संतांना आलेले अनुभव आपण पहात असतो पण आपण गांभीर्याने तिकडे लक्ष देत नाहीत. किंबहुना ते संत होते म्हणून त्यांना ते अनुभव आले, यात नवल काही नाही, अशीच आपली वेडी समजूत असते. खरे तर त्यांनी खडतर अशी तपश्चर्या पार पाडली, त्यांच्या गुरूंनी दिलेले धडे त्यांनी दृढतेने गिरवले व अतिशय कष्टप्रद असणारी ही सिद्धी त्यांनी प्राप्त केली. आपणही यातून प्रेरणा घेऊन अशी साधना करावी म्हणून कदाचित माऊलींनी त्यांचा अनुभव आपल्या समोर मांडला आहे.

त्यांच्या विमल चरणावर कोटी कोटी वेळेस दंडवत प्रणाम करून आजचा भाग इथे संपवूयात .

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरि माऊली



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

व भार्या सम्मीत यात पत्नी आज्ञार्थक बोलत नाही. असे केले तर. असे ती म्हणेल. रामाला इतके स्पष्ट तुमच्या कडून अधर्म होतोय असे सांगण्याची हिम्मत तशी लक्ष्मणा कडून देखील झाली नाही,ऋषी कडून झाली नाही. हे काम पत्नीच करू शकते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

आमचे कल्याण व्हावे, दुःख दूर व्हावे या साठी संत उपदेश करतात.

रामानी सीतेला याचे कारण विचारले. रामाच्या मनात अधर्म का निर्माण झाला याचे कारण सांगताना सीता म्हणते. माणसाच्या अंतःकरणात काम निर्माण झाला की ३ दोष,

व्यसने निर्माण करतो.१. माणूस खोटे बोलतो. २. पर दारा गमन ३. कोणतेही वैर नसतानाही धरण करतो.

आपल्या कडे बहुतेक उपदेश हे अरण्यात केलेली आहेत. म्हणूनच अरण्यक (वेदांचा भाग). हादेखील अरण्यात सांगितला गेला आहे. सत्य बोलावे. सत्य प्रिय होईल असे बोलावे. पण ते धर्मानुसार असावे.

सीता म्हणते पहिला दोष किंवा व्यसन, तुम्ही मिथ्या भाषण करणार नाहीत. तुम्ही सत्य वचनी आहात. त्यामुळे तुम्हास लागणे संभवत नाही. दुसरे व्यसन पर दारा गमन, हेही तुमच्या बाबतीत शक्य नाही.तुम्ही एक पत्नी आहात. तिसरे व्यसन मात्र तुम्हास लागले आहे असे वाटते.

आपण रोज वेग वेगळ्या ऋषींना भेटतो, मग आपणाजवळ प्रसन्नता हवी ना? आपण वनात काआलो? आपले तप वाढावे म्हणून इथे आलो ना.? **(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

# फंगल इन्फेक्शन

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

स्टिरॉइड क्रीमचा वापर : काहीवेळा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्टिरॉइड क्रीम वापरल्याने इन्फेक्शन वाढू शकते.

फंगल इन्फेक्शनची लक्षणे

फंगल इन्फेक्शनची काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

त्वचेला खाज सुटणे.

त्वचेवर लाल रंगाचे गोल चट्टे येणे (उदा. दाद किंवा रिंगवर्म).

त्वचेतून पांढऱ्या रंगाचा पदार्थ निघणे (उदा. यीस्ट इन्फेक्शनमध्ये).

त्वचेला भेगा पडणे किंवा फटी पडणे.

जळजळ होणे.

सतत केस गळणे (टाळूवरील फंगल इन्फेक्शनमध्ये).

नखांचा रंग बदलणे किंवा नखे जाड होणे (नखांच्या बुरशीमध्ये)

फंगल इन्फेक्शनचे प्रकार:

ॲथलीट्स फूट : हा पायांवर होणारा सामान्य बुरशीजन्य संसर्ग आहे, ज्यात खाज सुटणे, जळजळ होणे आणि त्वचेला भेगा पडणे ही लक्षणे दिसतात.

दाद : हा अत्यंत संसर्गजन्य बुरशीजन्य संसर्ग आहे जो त्वचा, टाळू आणि नखांना प्रभावित करतो. यात लाल, गोलाकार पुरळ आणि खवलेयुक्त त्वचा दिसते.

जॉक इच : हा जांघेच्या भागात होणारा संसर्ग आहे, ज्यात खाज सुटते आणि लालसरपणा येतो.

कॅंडिडा इन्फेक्शन : हे यीस्ट (कॅंडिडा) मुळे होते आणि तोंडाच्या आत (थ्रश), योनीमार्गात किंवा त्वचेच्या पटलांमध्ये होऊ शकते.

फंगल इन्फेक्शनवर उपचार आणि घरगुती उपाय

फंगल इन्फेक्शनवर उपचार करण्यासाठी डॉक्टर अँटीफंगल क्रीम, पावडर किंवा गोळ्या देतात. पण काही घरगुती उपाय देखील फायदेशीर ठरू शकतात.

स्वच्छता : संक्रमित भाग साबण आणि पाण्याने दिवसातून दोनदा स्वच्छ करा. यामुळे संसर्ग पसरण्यापासून रोखण्यास मदत होईल.

कोरडे ठेवा : त्वचा नेहमी कोरडी ठेवा, विशेषतः आंघोळीनंतर. ओलसर ठिकाणी बुरशी वाढते.

मोकळे कपडे : सैल आणि सुती कपडे वापरा जेणेकरून त्वचेला हवा मिळेल.

लसूण : लसूण ठेचून ऑलिव्ह ऑइलमध्ये पेस्ट करून संक्रमित भागावर लावा. लसूणमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात.

हळद: हळदीचा लेप पाण्यात भिजवून संक्रमित भागावर लावा. हळदीमध्ये अँटीफंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात.


कडुलिंब : कडुलिंबाच्या पानांची पेस्ट बनवून खाज येणाऱ्या ठिकाणी लावल्याने इन्फेक्शन कमी होण्यास मदत होते.

कोरफड (आलो वेरा) : कोरफडीचे जेल त्वचेला शांत करते आणि बरे होण्यास मदत करते.

खोबरेल तेल : खोबरेल तेल बाधित भागावर लावल्याने खाज सुटणे आणि जळजळीपासून आराम मिळतो.

ॲपल सायडर व्हिनेगर : व्हिनेगर आणि पाणी समान प्रमाणात मिसळून कापसाच्या बॉलने लावा. यामुळे त्वचेचा पीएच संतुलित राहतो आणि बुरशीची वाढ रोखण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९




# देवगिरी बँकेला मिळाला शेड्युल बँकेचा दर्जा



**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – नुकतेच देवागिरी बँकेला रिझर्व बँकेकडून शेड्युल बँकेचा दर्जा मिळाला आहे या निमित्त आज देवगिरी बँकेचे माननीय संस्थापक संचालक व राजस्थानचे महामहीम राज्यपाल, आदरणीय श्री. हरिभाऊ बागडे नाना यांची आज बँकेच्या सर्व संचालकांनी मिळून स्नेह भेट घेतली व आशीर्वाद घेतले.

माननीय नानांनी बँकेची चौकशी केली व बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो अशा शुभेच्छा दिल्या आशिर्वाद दिले. खूप आनंदाचा क्षण होता खरोखरच नानांनी ज्या पद्धतीने बँक सुरू केली आणि सामान्य माणसांसाठी चालवली, गरज असेल तेव्हा स्वतः लक्ष देऊन कडक वसुली पण केली, तो मराठवाड्यात नव्हे तर महाराष्ट्रात एक चांगली सहकारी संस्था कशी असावी, याचं उत्तम उदाहरण असल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसते.

यावेळी मा. नानांच्या काळात त्यांनी बँकेची केलेली कडक वसुली, अनेकांना व्यवसायात उभे राहण्यासाठी केलेली धाडसी मदत....अशी त्यांच्या उत्कृष्ट प्रशासनाच्या गोष्टी संचालकांना ऐकायला मिळून एक प्रकारे उपस्थित संचालकांचा प्रशिक्षण वर्गच झाला.

नानांनी लावलेल्या रोपट्याचं आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे, यामध्ये माननीय नानांसह आजवरच्या सर्व संचालक मंडळाचा वाटा आहे, बँकेच्या सभासदांचे आशीर्वाद आहेत, ग्राहकांचे प्रेम आहे, या सर्वांच्या जोरावरच आज देवगिरी बँक या स्तरावर येऊन पोहोचलेली आहे.

यावेळी बँकेचे माननीय माजी अध्यक्ष राम भोगले सर, अध्यक्ष किशोर शितोळे, उपाध्यक्ष उमेश दाशरथी, माननीय संचालक सजनराव मते, नागनाथ आप्पा काजळे, जयश्रीताई किवळीकर, अमितताई लेकुरवाळे, वाहेगावकर ताई, प्रज्ञा तल्हार, डॉक्टर क्षमाताई खोब्रागडे, सुरेश जगाडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर, दत्ता शिंदे साहेब, कर्मचारी संघाचे अध्यक्ष भारत मस्के हे उपस्थित होते.

# इंदापूरी निखारे



## आईची महती



**ज्योतिर्मय साहित्य**

आई आणि मुलीचे भयाण प्रेम
बाप नंबरी तर मुलगा दस नंबरी
असे बाप मुलाच्या जोडी बाबत म्हटले जाते,
तसेच बापसे बेटा सवाई ! असेही कौतुकाने म्हणतात.

पण मुलींच्या बाबतीत असे काही ऐकल्याचे आठवत नाही. मुलींचे कौतुक करण्याची पद्धत घराण्याचे नाव, सुशील, आज्ञाधारक आणि अनेक सद्गुण वगैरे वगैरे!पण आता काळ प्रचंड वेगाने बदलत चालला आहे. तांत्रिक प्रगतीमुळे तर कोणाशीही क्षणात संवाद होऊ शकतो, जगभरातील माहिती काही क्षणात आपल्या मुठीत. कर लो जग मूठठीमे असे काहीसे !

संवाद साधता येतो पण संवेदना हरवून गेल्या आहेत असे अनेक आजूबाजूला होत असलेल्या घटनावरून काही अजून बधिर न झालेल्यांना जाणवते. पण ते अतिशय किरकोळ असल्याने त्यांना कोणी विचारत पण नाही.



अशीच एक घटना घडून गेली, पण अर्थात आपल्याला तसे काहीच घेणं देणं नसल्याने आणि दुर्लक्ष करणे हा अतिशय अप्रतिम संस्कार असल्याने ! तशी काळजी करण्याची काही गरज पण नाही.बधिर होऊन जगण्याचा प्रयत्न काही जणं आवर्जून करत आहेत. अतिशय कोरडे पणाने, शक्य तो कोणाच्या भावना न दुखावता, आनंदच होईल असे वाटते, तर एक अल्पवयीन मुलगी प्रेमात बेधुंद होऊन गेली. म्हणजे १८ वर्षाच्या आतील. ती प्रियकरा बरोबर पळून गेली. आई फार काळजीने घाबरून गेली, कशीबशी त्यातून स्वतःला सावरले आणि पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी योग्य ती कारवाई करून मुलीला शोधून घरी आणले. आईने निर्णय घेतला आणि तिला मामाकडे पाठवले. पण तिथे दुसऱ्या मुलाच्या प्रेमात! मामा घाबरला आणि तिला परत आणून सोडले.

अजून सज्ञान न झालेली मुलगी त्या मुलाबरोबर सतत फोनवर, आईला काही समजेना, काय करावे? घरात सतत वादावादी ! ती एक दिवस त्याचा फोन नंबर मिळवते. त्याला फोन करून सांगते, हे बघ तुला पटत असेल तर! मी तुला ५००००/ रुपये देते. तू माझ्या मुलीचा खून कर. तो एकदम खूष होऊन जातो. तिला पळवून नेतो अगदी बिनधास्त! तिला सांगतो, तुझी आई म्हणाली की तुला मारून टाक! ५००००/ रुपये देते म्हणाली. आपले एकमेकांवर किती प्रेम आहे हे तूझ्या आईला समजले नाही. आपण काय करू. तुला मारून टाकल्याचे फोटो काढू, आईला पाठवून देऊ, ती जे पैसे देणार त्यामध्ये काहीतरी करू या !

आता प्रेमात पडलेली अशा आडनिड्या वयातील ! त्या वयातील अशीच अजून काही भव्यदिव्य स्वप्ने ! मग दोघे मिळून अगदी मस्त फोटो काढून आईला व्हाट्सअप वर पाठवतात. ती मेलेली पाहून आई खूष होऊन जाते. तो म्हणतो ५००००/रुपये पाठवून द्या. ती प्रेमाने नकार देते, एकदोनदा विनंती करतो पण आई ऐकत नाही. मग तो अतिशय नाईलाजाने सांगतो की मुलीला मारले नाही. तुम्ही हे असे करणार हे माझ्या प्रेयसीने म्हणजे तुमच्या मुलीने सांगितले होते. तुम्ही तिला घेऊन जा. पत्ता पाठवत आहे.

अतिशय नाईलाजाने आई मुलीला आणण्यासाठी. तो तिला घेऊन थोडे दूर असलेल्या शेतात. तिथे तिची लाडकी मुलगी प्रिय आईची वाट पहात!प्रेमाचा, वात्सल्याचा, भाव भावनांचा मागमूस नसलेले चेहरे एकमेकांना भिडतात आणि रक्ताच्या थारोळ्यात आई! खूपच छान दिसत होती! ती तिच्या मित्राला म्हणाली कसली मस्त दिसत आहे ना आई! सर्व अंगाला कुंकू लावले असे वाटते.

कोठेतरी रेडिओवर गाणे! अस्पष्ट, आर्त स्वरात.
आई आई...
प्रत्येक ओळीत आईची महती !
पूर्णपणे गाण्याचा आत्मा हरवून गेलेला
अर्थ, भेसूर, बिभत्स...

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

## शांतिनिकेतन ते विश्वभारती

"ग्रामीण समस्येच्या निवारणाकरता समोर ठेवलेला दृष्टिकोन हा एकसंघ असावा. तो विस्कळीत असू नये. ग्रामीण जीवनातल्या सर्व महत्त्वाच्या समस्या एकत्रितरीत्या सोडवता आल्या पाहिजेत. परंतु हे करीत असताना माणसाच्या सर्वांगीण प्रयत्नांना आवाहन केले पाहिजे. ग्रामसेवकाने केवळ बुद्धी, हात व तांत्रिक ज्ञान यांचाच वापर करू नये, तर त्याला त्याच्या कार्यात भावनिक आत्मीयताही वाटली पाहिजे. आरोग्य, बुद्धी, ज्ञान, काम आणि आनंदाची भावना एक दुसऱ्यात मिसळून जातील तेव्हाच मानवाचे कल्याण खऱ्या अर्थाने पूर्णत्वास पोहोचेल."

एल्म हर्स्टला आपले काम करण्यासाठी रवींद्रनाथांनी पूर्ण स्वातंत्र्य दिले आणि आपली कोणतीही मते त्याच्यावर लादली नाहीत. यातच त्यांचा मोठेपणा दिसून येतो. एल्म हर्स्टने देखील त्यांच्या तत्वांना अनुसरून ग्रामीण भागातील पुनर्रचनेचे आपले कार्य धडाडीने सुरू ठेवले. या वाटचालीत ग्रामीण विकासाचा एक परिणामकारक असा कार्यक्रम लोकांसमोर आला. स्वतः रवींद्रनाथ आणि एल्म हर्स्ट यांच्यासोबत संतोष चंद्र मुजुमदार, गौरगोपाल घोष, कालीमोहन घोष, किम तारो कासहारा यांचेही या वाटचालीत योगदान होते. ही योजना इतकी सुंदर आणि प्रभावी ठरली की नियोजन आयोगाने सुद्धा त्यातील बऱ्याचश्या गोष्टी ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपल्या कार्यपद्धतीत समाविष्ट केल्या.

श्रीनिकेतन हे केवळ शैक्षणिक केंद्र नव्हते तर स्थानिक कला आणि हस्तकलांना उत्तेजन देणारे एक मोठे सांस्कृतिक केंद्र होते. पारंपारिक हस्तकलांच्या विकासासाठी श्रीनिकेतनचे योगदान अतिशय महत्त्वाचे ठरले. त्याचबरोबर या ठिकाणी शेती, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि कुटीर उद्योगांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. अशा तऱ्हेने विश्वभारती विद्यापीठाचा एक भाग असलेले हे श्री निकेतन ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्यरत होते. केवळ शाळा किंवा विद्यापीठ स्थापन न करता ग्रामीण भागातील लोकांचाही विकास व्हावा, शेतीमध्ये शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रांचा वापर करावा, त्यांच्यामध्ये साक्षरता यावी, नवनवीन तंत्रांची आणि वैज्ञानिक शोधांची त्यांना माहिती व्हावी, स्वच्छतेचे महत्व पटावे, आजारांशी योग्य उपचाराने सामना करता यावा यासारखे अनेक उद्देश या माध्यमातून साध्य झाले. यातून रवींद्रनाथांची दूरदृष्टी आपल्याला दिसून येते.

सहजपाठ : रवींद्रनाथांची अनमोल देणगी (१)

रवींद्रनाथांच्या स्वतःच्या शिक्षण विषयक काही कल्पना होत्या. मुलांना औपचारिक पारंपारिक शिक्षण देण्यापेक्षा नैसर्गिकरित्या ते कसे शिकतील यावर त्यांचा भर होता. त्या दृष्टीनेच त्यांनी शांतिनिकेतन मधील मुलांना शिकवले. रटाळ घोकंपट्टी त्यांना कधीच मान्य नव्हती. तर भोवतालचे वातावरण, निसर्ग यांचे निरीक्षण करता करता मुलांनी त्यातून सहज शिकावे असे त्यांना वाटत होते. त्यातूनच त्यांचे सहजपाठ निर्माण झाले. रवींद्रनाथ केवळ व्यासपीठावरून भाषण देणारे किंवा वृत्तपत्रात मोठ-मोठे शिक्षण विषयक लेख लिहिणारे शिक्षणतज्ज्ञ कधीच नव्हते. कोणत्याही गोष्टीची सुरुवात स्वतःपासून आणि मुळापासून करणारे ते प्रायोगिक शिक्षणतज्ज्ञ होते. म्हणून केवळ शिक्षणसंस्था काढून ते शांत बसले नाहीत तर विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अतिशय सुंदर पाठ्यपुस्तके तयार केली. ही पाठ्यपुस्तके म्हणजेच सहजपाठ आणि हे सहजपाठ म्हणजे त्यांनी बंगालला दिलेली सर्वात मोठी देणगी असे म्हणावे लागेल ! मुळात सहजपाठ हे नावच किती सुंदर आहे ! सहजपाठ होणारे ते सहजपाठ ! **(क्रमशः)**




# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रेसर – अण्णाभाऊ



**ज्योतिर्मय साहित्य**

भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी "लालबावटा" कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाट्ये या माध्यामातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिमाभागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी आपल्या 'लालबावटा' कलापथकातर्फे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची '१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना' होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, "ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!" इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन मध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठी भाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. या चळवळीत त्यांची अग्रसर भूमीका होती.

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी–आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करतांना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले. अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले असले तरी, त्यांचा मूळपिंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, "मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील, पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्क राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे" या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि–अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण–घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.

प्रविण बागडे
नागपूर

भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे" यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, "दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही."

"अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनी फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत."

मुंबई, पूणे आणि मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या "मुंबईची लावणी" आणि "मुंबईचा गिरणी कामगार" या दोन गाण्यांतून मुंबईला "दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण" असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याचा मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही. भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषतः मांग जातीचे प्रतीक बनले आहेत. शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग–आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष– शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांमध्ये समर्थन मिळविण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे आणि आजही करीत असतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, ज्याला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ गैरभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्या व्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

१ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. पुण्यातील सेनापती बापट चौकानजीक रस्त्याला अण्णाभाऊ साठे मार्ग म्हणुन घोषित करण्यात आले. मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी, त्यांना आदराने व विनम्रपणे श्रद्धांजली अर्पण करणे, हा मराठी भाषिकांसाठी एक महत्त्वाचा दिवस असतो. त्यांच्या कार्याला व विचारांना स्मरून त्यांना आदराने अभिवादन करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



# सकारात्मक दृष्टिकोन - तन्वी:द ग्रेट


ज्योतिर्मय साहित्य

**जर कोणी तुम्हाला कधी सांगितलं, की तू काही करू शकत नाहीस, किंवा तुझं स्वप्न खोटं आहे. तर त्याला एकच उत्तर द्या. तन्वी: द ग्रेट हा सिनेमा बघा.आयुष्यात अशक्य असे काहीच नसते. सारे शक्य आहे, सिनेमा बघून प्रत्येकाचा दृष्टिकोनच बदलून जाईल. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या तन्वी: द ग्रेट या चित्रपटावर टाकलेला हा दृष्टीक्षेप....**

ओम जय जगदीश नंतर तब्बल दोन दशके दिग्दर्शनापासून दूर राहिलेल्या अनुपम खेर यांनी या चित्रपटातून पुन्हा एकदा दिग्दर्शक म्हणून पुनरागमन केलं आहे. यावेळी मात्र त्यांच्या दिग्दर्शनात स्पष्टता आणि आत्मविश्वास स्पष्ट जाणवतो. जी त्यांच्या पहिल्या चित्रपटात थोडीशी कमी होती. यावेळी त्यांना योग्य कथा, योग्य सूर आणि जबरदस्त कलाकारांची टीम मिळाली आहे, जी प्रत्येक फ्रेममध्ये आपली कामगिरी उत्तमरीत्या पार पाडते. तन्वी: द ग्रेट' हा चित्रपट हृदयाला स्पर्शून जातो आणि पडदा काळा झाल्यानंतरही मनात घर करून राहतो. हा केवळ एक सिनेमा नाही, तर एक अनुभव आहे . ज्याला आपलंसं करून जवळ ठेवावं असं वाटतं. अतिशयोक्ती न करता, अत्यंत संयमाने हा चित्रपट ऑटिझम सारख्या विषयावर भाष्य करतो, आणि भारतीय लष्कराविषयी आदर व्यक्त करतो . कोणतंही ढोलबंबा न करता. इथे ना जोरजोरात देशभक्तीचं गोंधळ आहे, ना भावना खेचण्याचा प्रयत्न आहे. ती फक्त प्रामाणिक कथा, जी थेट हृदयाशी जाऊन भिडते.

'तन्वी: द ग्रेट' ही तन्वीची कहाणी आहे. एका तरुण ऑटिस्टिक मुलीची (शुभांगी दत्त), जिला दिल्लीहून उत्तराखंडमधील शांत आणि शिस्तबद्ध लष्करी गाव, लॅन्सडाउन येथे आणण्यात येतं. तिची आई, विद्या (पल्लवी जोशी) जी ऑटिझम विषयातील जाणकार आहे एका आंतरराष्ट्रीय परिषदेकरता अमेरिकेला जाणार असते. आणि ती तन्वीची जबाबदारी सोपवते तिच्या वडिलांना कर्नल रैना (अनुपम खेर) यांच्याकडे. कर्नल रैना हे निवृत्त लष्करी अधिकारी जितके शिस्तप्रिय, तितकेच ऑटिझम म्हणजे काय, याबाबत अनभिज्ञ. प्रारंभी, रैना तन्वीला एका सर्वसामान्य मुलीसारखं वागवतात. परिणामी गैरसमज आणि तणावपूर्ण क्षण निर्माण होतात. मात्र जसजसे दिवस पुढे सरकतात आणि विद्या परदेशी जाते, तसतसे रैना आपल्या नातवंडाच्या अनोख्या जगाकडे समजून घेत पाहू लागतात. आणि मग एक अनपेक्षित वळण येतं.तन्वीला तिच्या दिवंगत वडिलांनी मागे ठेवलेला एक व्हिडीओ क्लिप सापडतो. तिचे वडील हे भारतीय सैन्यात शहीद झालेले जवान ज्यांची शेवटची इच्छा होती सियाचेनमध्ये भारतीय तिरंग्याला सलामी देण्याची. तो क्षण तन्वीच्या आयुष्यात एक ठिणगी पेटवतो. ती नक्की ठरवते की, आता ती सैन्यात भरती होईल आणि वडिलांची अपूर्ण इच्छा स्वतः पूर्ण करेल. या चित्रपटाचं यश हे केवळ कथेत नाही, तर त्या पात्रांमध्ये आहे ज्यांनी ही कथा जिवंत केली आहे. शुभांगी दत्त हिचं कामगिरी म्हणजे एक धक्कादायक आश्चर्यच. तिच्या अभिनयात एक असं नैसर्गिक प्रामाणिकपण आहे, ज्यामुळे ''तन्वी'' ही व्यक्तिरेखा आपल्याला पूर्णतः खरी वाटते. ती अभिनय करत नाही ती तन्वीच बनून जाते.

अनुपम खेर, कर्नल रैना यांच्या भूमिकेत, कठोरतेने वाढलेला पण आतून मृदू होत चाललेला आजोबा हा संघर्ष त्यांनी अत्यंत संयम आणि ऊब राखून साकारला आहे. जॅकी श्रॉफ ब्रिगेडियर जोशीच्या छोट्याशा भूमिकेतही चमकतात. अरविंद स्वामी, मेजर श्रीनिवासनच्या रूपात एक प्रशिक्षक ज्याच्या स्वतःच्या भूतकाळातले सावट अजूनही त्याच्या व्यक्तिमत्वावर आहे. ही भूमिका त्यांनी अत्यंत गाभ्याने रंगवली आहे. बोमन ईरानी ''रझा साब''च्या रूपात नेहमीसारखेच दिलखुलास आणि एक सुरेल स्पर्श घेऊन येतात, जो चित्रपटाच्या भावनात्मक प्रवासात एक वेगळीच लय निर्माण करतो. क्लायमॅक्समध्ये नास्सर एका लहानशा पण ठसठशीत भूमिकेत दिसतो. आणि विशेष म्हणजे, 'गेम ऑफ थ्रोन्स'मधील सेर जोरा मॉरमोंट म्हणून प्रसिद्ध असलेले आयन ग्लेन यांचं एक कॅमिओ जे चित्रपटाला एक अनपेक्षित आंतरराष्ट्रीय स्पर्श देतं. तो क्षण प्रेक्षकांसाठी एक आनंददायक आश्चर्य ठरतो.तन्वी: द ग्रेट' विशेष ठरतो कारण काळजात खोलवर उतरतो.तन्वी द ग्रेट' ला खऱ्या अर्थानं वेगळं ठरवतं ती म्हणजे त्याची भावनिक समजूतदारी. हा चित्रपट कुठेही भावना जबरदस्तीने ढकलत नाही, ना प्रेक्षकांच्या डोळ्यांतून अश्रू काढण्याचा अट्टहास करतो. लॅन्सडाउनसारखं सैनिकी वातावरण लाभलेलं पार्श्वभूमी नैसर्गिकपणेच कथेला साजेसं वाटतं. पण दिग्दर्शक आणि लेखकाचं खरं यश म्हणजे त्यांनी ही कहाणी जमिनीवर ठेवली आहे, भडकपणापासून लांब. हा चित्रपट युद्धाबद्दल नाही, ना बलिदानाबद्दल. ही गोष्ट आहे नात्यांची. एका नात आणि आजोबांमधील नातं, मित्रांमधील विश्वासाचं नातं, आणि अपरिचितांमधील ते बंध जे मार्गदर्शक बनतात. मेजर श्रीनिवासनला समजतं की तन्वी ही त्याच्या प्राण वाचवणाऱ्या जवानाची मुलगी आहे.







हा प्रसंग, किंवा जेव्हा तन्वी पहिल्यांदा आपल्या आजोबांना ''डाडू'' म्हणते हे क्षण इतक्या शांततेने, इतक्या साधेपणाने हाताळले गेले आहेत की ते तुम्हाला आतून हलवून टाकतात आणि हे सर्व एका सुद्धा व्हायोलिनच्या सूरांशिवाय. हीच 'तन्वी द ग्रेट' ची खरी ताकद आहे. ती तुमचं मन हलवते, पण नकळत, शांतपणे.काही सिनेमे हे केवळ कथा सांगत नाहीत, ते सिनेमाच्या अस्तित्वाला अर्थ देतात. अशा चित्रपटांमधूनच आपल्याला जाणवतं की सिनेमा ही केवळ करमणूक नाही, तर आत्म्याला स्पर्श करणारी कला आहे जी आपल्यामध्ये काही मूल्यं सोडून जाते, आपल्या आयुष्याचा प्रवास थोडासा वेगळा करू शकते. तन्वी द ग्रेट हा अशा फार थोड्या, पण अमर होणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे.

अनुपम खेर यांनी मनापासून बनवलेला, सजगतेने सांगितलेला आणि हृदयाला भिडणारा असा सिनेमा आपल्या समोर ठेवला आहे. तन्वी: द ग्रेट ला फक्त एक ''सिनेमा'' म्हणणं अपुरं वाटतं ही तर एक अनुभूती आहे. एक अशी भावनिक प्रक्रिया जी तुम्हाला नम्र करते, विचारात टाकते, आणि अंतर्मनात काहीतरी हलवून जाते. सिनेमाची सुरुवात होते त्या फोन कॉलपासून, जिथे तन्वी आपल्या वडिलांशी बोलते आणि तोच त्यांचा शेवटचा संवाद ठरतो. त्या क्षणापासून चित्रपट तुमच्या हृदयाला जखडून ठेवतो. तुम्ही तिचा प्रवास जगायला लागता. तिच्या प्रत्येक यशासाठी धडपडता. तिच्या वेदनांमध्ये रडता.

इंटरवलसुद्धा त्रासदायक वाटतो जणू काही तुमचं खाससं, वैयक्तिक असं काहीतरी तोडून टाकलं गेलंय. तन्वीच्या प्रवासातून चित्रपट आपल्याला सहजतेने सांगतो की आपण जिथे-तिथे आपल्या अडचणींबद्दल तक्रार करतो, तिथे काही लोक असंख्य अंतर्गत युद्धं लढत असतात त्यांची जिद्द आणि शांत संघर्ष आपल्या कल्पनांपलीकडचा असतो. हा चित्रपट भारतीय लष्कराप्रती नवा आदर निर्माण करतो आणि त्याला फक्त ताकदीचं नाही, तर मनाचंही सैन्य म्हणून उभं करतो.तन्वी: द ग्रेट' हा केवळ एक चित्रपट नाही. तो एक साक्षात्कार आहे. एक स्मरण आहे की कोणतंही स्वप्न खूप मोठं नाही आणि कोणतीही मर्यादा अपराजेय नाही.

तो आपल्याला आपल्या भीतीकडे, आपल्या सबबींकडे नव्याने पाहायला लावतो.हा चित्रपट आपल्या सोबत घरी जातो मनात राहतो, प्रेरणा देतो, आणि सशक्त बनवतो.

हा चित्रपट तुम्ही फक्त पाहत नाही

तो तुम्हाला स्पर्श करून जातो. जवळपास १६० मिनिटांचा पण कुठेही कंटाळवाणा वाटत नाही. त्याची गती जीवनासारखीच आहे कधी संथ, कधी झपाट्याने पुढे जाणारी, पण नेहमी पुढेच वाटचाल करणारी. जेव्हा एखादी कथा ऑटिझम, दुःख, कुटुंब, स्वप्नं आणि लष्कर या सगळ्यांचा समावेश करून सांगायची असते, तेव्हा तिला वेळ द्यावाच लागतो. आणि 'तन्वी द ग्रेट' तो वेळ अतिशय योग्य प्रकारे वापरतो. परिस्थितीला न डगमगता तोंड देण्याची क्षमता. ही कथा आहे की मुले आपल्याला किती आश्चर्यचकित करू शकतात, प्रेम कसे खोल खोल गैरसमज सुद्धा भरून काढू शकते, आणि शांत पण ठाम निश्चयाने कसे अडथळे पार करता येतात. शेवटी, 'तन्वी द ग्रेट' ही केवळ एका ऑटिस्टिक मुलीची तिच्या वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्याची कथा नाही ही कथा आहे दृष्टिकोन बदलण्याची. ही आपल्याला क्षमता, स्वीकार आणि खऱ्या धैर्य या संकल्पनांचा नव्याने विचार करायला भाग पाडते.हा चित्रपट फक्त पाहायचा नसतो तो अनुभवायचा असतो. तो अंतर्मनाला हलवतो आणि आपण थोडे अधिक संवेदनशील होतो. कदाचित हेच या चित्रपटाचं सगळ्यात मोठं यश आहे तो ओरडत नाही, पण निघून गेल्यावरही मनात एक शांत, खोल प्रतिध्वनी सोडून जातो.


आणि जर तन्वीच्या प्रवासातून एक गोष्ट शिकलोच, तर ती ही,''कधी कधी, प्रेमाने टाकलेली छोटीशी पावले आपल्याला सर्वात मोठ्या ठिकाणी पोहोचवू शकतात.''या सिनेमाच्या संपूर्ण टीमला मनापासून सलाम आणि आभाळभर शुभेच्छा.

सिनेमा- तन्वी: द ग्रेट
दिग्दर्शक- अनुपम खेर
कलाकार- शुभांगी दत्त,पल्लवी जोशी,बोमन इराणी,अनुपम खेर,जॅकी श्रॉफ,अरविंद स्वामी आणि इतर
स्टार- ****१/२ ( साडेचार)

**आशिष निनगुरकर**
(लेखक चित्रपट अभ्यासक आहेत.)

# एक जाज्वल्य दीपस्तंभ : श्रीजगदम्बार्पणमस्तु

ज्योतिर्मय साहित्य



पुस्तक परीक्षण
सौ. रोहिणी पांडे, पुणे
९५५२४९२४०९

'श्रीजगदम्बार्पणमस्तु' ही कादंबरी म्हणजे लेखक चंद्रहास सोनपेठकर यांनी आपल्या आजोबा, परमपूज्य श्रीगुरु शास्त्री महाराज (वै.भगवानशास्त्री महाराज सोनपेठकर) यांच्या जीवनचरित्रावर आधारित, भावनिक आणि आध्यात्मिक रंगांनी नटलेली कथाकृती आहे.

ही कथा एका असामान्य व्यक्तिमत्वाच्याएक आध्यात्मिक संत, तत्वज्ञ, धर्मनिष्ठ व्यक्तिमत्वाच्या जीवनप्रवासाचे एक उत्कृष्ट चित्रण करते.

रचना व अध्यायावरील संक्षिप्त दृष्टीक्षेप : या पुस्तकात २९ सुसंगत अध्याय आहेत. काही प्रमुख अध्याय हे विशेष उठून दिसतात:

'ते पंधरावे फूल' या पहिल्या अध्यायात लेखकाने शास्त्री महाराजांच्या जन्मप्रसंगाचे वर्णन इतक्या भक्तिभावाने केले आहे की वाचकाला तो प्रसंग दृश्यरूपात समोर उभा राहतो. 'उपनयनसंस्कार', 'गुरुकुलजीवन', 'बासर अनुष्ठान' या प्रकरणांतून संस्कार, शिस्त, साधना, आणि आशीर्वाद यांचे अनोखे दर्शन घडते.

काशीतील ज्ञानयात्रा, वारकरी संप्रदायातील प्रवेश, जगदंबा व मारुतीरायांची भक्ती, प्रवचन शैली व अध्यापन, कीर्तन परंपरा आदी प्रकरणे महाराजांच्या जीवनाची व्यापकता अधोरेखित करतात.

'बाबुशाचे आजोबा' हे शेवटचे प्रकरण हे एक नातवाने श्रद्धेने केलेले अत्युच्च नमन आहे.

भाषा आणि शैली : लेखकाची भाषा ही अत्यंत भावनिक, शुद्ध, संस्कृतप्रचुर आणि स्वरूपाची आहे. शास्त्री महाराजांचे चरित्र लिहिताना लेखकाने स्वतःला ''लेखक'' न मानता ''श्रवण करणारा शिष्य'' असे संबोधले आहे. त्यामुळे ही रचना केवळ चरित्रात्मक नसून अनुभवात्मक आहे.

श्लोक, स्तोत्रं, पारंपरिक वचन, कीर्तनसंगती यांचा वापर लेखनात एक वेगळी आध्यात्मिक उंची प्राप्त करतो.

वैशिष्ट्यपूर्ण बाबी : चरित्र व कथाकथन यांचा सुरेख संगम ही कादंबरी माहिती देत नाही, शब्दानुभव देते.

गुरुशिष्य परंपरेचे दर्शन शिष्यत्व, सेवा, भक्ती यांचा उत्कट भाव प्रकट झाला आहे.

संस्कृतीचे जतन गुरुकुल शिक्षण, उपनयन, वेदाध्ययन, साधना, तीर्थयात्रा, प्रवचन-कीर्तन यांच्या स्वरूपातून सनातन संस्कृतीचा मूळ गाभा जपला आहे.

सामाजिक जागृतीचा आविष्कार - शिक्षण, संयम, सत्य, आणि साधेपणा या गुणांचा नितांत सुंदर आविष्कार या कादंबरीत आहे.

जीवनप्रकाश - लेखकाने विविध प्रसंगांमध्ये आजोबांचा साधनेतून मिळालेला तेजोमय जीवनप्रकाश अत्यंत प्रामाणिकपणे उलगडला आहे.

लेखकाचे मनोगत - हृदयस्पर्शी आणि प्रामाणिक

लेखकाच्या शब्दांत, ''मी लेखक नाही, मी एक 'श्रोता' आहे.'' ही भावना संपूर्ण पुस्तकभर उमटलेली आहे. ही केवळ नातवाची श्रद्धांजली नाही, तर एका शिष्याची आत्मानुभवातून प्रकटलेली श्रीगुरुमहाराजांची चरित्र कथा आहे.

शैक्षणिक व आध्यात्मिक उपयुक्तता

विद्यार्थ्यांसाठी: गुरुकुल शिक्षण, ब्रह्मचर्य, वेदाध्ययन यांचे प्रेरणादायक दर्शन

शिक्षक व गुरुजनांसाठी: अध्यापनातील वर्तन, नैतिकता आणि जीवनमूल्यांचे उदाहरण

सर्वसामान्य वाचकांसाठी: भक्ती, साधना, संतसेवा, संयम, जीवनातील तात्त्विक अर्थ यांचा उलगडा

ही कादंबरी फक्त वाचण्याची नाही, ही अनुभवायची आहे. 'श्रीजगदम्बार्पणमस्तु' हे केवळ एका व्यक्तिमत्वाचे जीवनचरित्र नसून, ही एक चालतीबोलती तीर्थयात्रा आहे. जिचा प्रत्येक अध्याय म्हणजे एक आध्यात्मिक पर्वणी आहे.

रेटिंग: (लेखन, गूढता, भावनिक गुंफण, साहित्यिक मूल्य आणि अध्यात्मिक प्रेरणा या सर्व बाबतीत उत्तम)

शब्दात मांडता येईल इतकाच हा जीवनप्रवास नाही तो 'जगदंबेच्या चरणी समर्पित' असलेला एक जाज्वल्य दीपस्तंभ आहे!

आपण ही कादंबरी आवर्जून वाचावी आणि इतरांनाही वाचायला लावावी ती स्वतःमध्ये एक साधना आहे.

पुस्तक परीक्षण ॥ श्रीजगदम्बार्पणमस्तु ॥
लेखक: चंद्रहास दुर्गादासराव सोनपेठकर
प्रकाशित: जुलै २०२५ । : ISBN: 978-93-343-2837-0
मूल्य: रू१००/- (पोस्टेजसहित) पृष्ठसंख्या: १०८
मुद्रक: सागर झेरॉक्स, पुणे

# युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

श्याम ठाणेदार
पुणे

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559